॥ माझे राष्ट्र महान ॥

गायकः शाहीर साबळे आणि कोरस
गीतः चकोर आजगांवकर

महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय
जयजय राष्ट्र महान।
महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय
माझे राष्ट्र महान।
कोटी कोटी प्राणांत उसळतो
एक तुझा अभिमान ॥ धृ. ॥

बलिदाने इतिहास रंगला तुझाच पानोपान
तूच ठेविले स्वातंत्र्याचे फडकत उंच निशाण।
तू संतांची मतिमंतांची बलवंतांची खाण
तूच ठेविला कर्मयोगमय जागृत यज्ञ महान ॥ १ ॥

मातीच्या चित्रात ओतिले विजयवंत तू प्राण
मराठमोळी वाणी वर्णी वेदांतांचे ज्ञान।
पंढरीत नांदले अखंडित भक्तिचे जयगान
ब्रीद न सुटले झुंझाराचे रणी होता निर्वाण ॥ २ ॥

वज्रापुढती अभंग ठरले तुझेच ना पाषाण
काळालाही जिंकुन गेले इथले प्रज्ञावान।
मानवतेचे समतेचे तू एकच आशास्थान
पराक्रमावर तुझ्या विसंबे अखंड हिंदुस्थान ॥ ३ ॥